सुरक्षित क्षेत्रांचे (Protected Area) संरक्षणाकरीता वन रक्षकांची अतिरिक्त पदे निर्माण करण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०११/प्र.क्र.२४३/फ-१.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०१ नोव्हेंबर, २०११.

**वाचा :-** १. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक : कक्ष-२२(४)/आस्था/१६७९/११-१२, दिनांक २०.०८.२०११.
२. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पृष्ठांकन क्रमांक : संयुक्त २०११/इतिवृत्त/ २१६/११/विसु-१, दिनांक ३०.०८.२०११.
३. उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या ६७ व्या बैठकीचे कार्यवृत्त क्र.पदनि-२०११/प्र.क्र.२१०/११/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ०८.०९.२०११

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याला विपुल वनसंपदा लाभलेली अ हे. राज्यात दुर्मिळ वन्यप्राणी आढळतात. वन्यप्राण्यांचे प्रभावी संरक्षण व संवर्धनाकरीता राज्यात विविध अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने स्थापित करण्यात आलेली आहेत. त्यासाठी वनविभागात वन्यजीव शाखा पूर्वीपासून कार्यरत आहे. वन्यप्राण्यांचे प्रभावी संरक्षण होण्याबरोबरच त्यांच्या नैसर्गिक अधिवासांचे विकासासाठी अतिसंवेदनशिल सुरक्षित क्षेत्रासाठी वनरक्षकांची १०० अतिरिक्त पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन होता. सदर प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ०३.०९.२०११ रोजीच्या बैठकीत विधीवत मंजूरी दिली आहे.

**शासन निर्णय :-**

वार्षिक योजना सन २०११-१२ मध्ये राज्य योजने अंतर्गत वन्यजीव शाखेस वनाचे संरक्षण करण्याकरीता नागपूर, नाशिक व मुंबई वन्यजीव वृत्ताकरीता अतिरिक्त १०० वनरक्षक पदे रु.५२००-२०२०० + ग्रेड पे रु.१८०० या वेतनश्रेणी मध्ये निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदे माजी सैनिक, माजी सीमा सुरक्षा दलातील जवानांमधून शक्यतो बाह्य स्त्रोताव्दारे (Out Sourcing) भरण्याकरीता उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ०३.०९.२०११ रोजीच्या बैठकीत विधीवत मंजूरी दिली आहे. सबब, उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने वनरक्षकांची १०० पदे निर्माण करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर पदे वनरक्षकांची सध्या चालु असलेल्या भरती प्रक्रियेत तयार करण्यात आलेल्या निवडयादीतून भरावी. तसे केल्यामुळे पर्याप्त संख्येत उमेदवार मिळत नसतील, तर सदर पदे माजी सैनिक, माजी सीमा सुरक्षा दलातील जवानांमधूनच शक्यतो बाहय स्त्रोताद्वारे (Out Sourcing) भरण्यास या शासन निर्णयाव्दारे

मान्यता देण्यात येत आहे. अशा प्रकारे नियुक्त वनरक्षकांना नियमित वेतनश्रेणी न देता रु. १२००० + इतर भत्यासाठी रु.२००० याप्रमाणे दरमहा एकत्रित रक्कम देण्यात यावी. सदर पदे भरण्यासाठी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण बोर्डमधून योग्य उमेदवारांची नावे प्राप्त करुन घ्यावी. अशाप्रकारे वनरक्षकांसाठी शैक्षणिक व शारीरिक अर्हतेची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती देण्याचे अधिकार संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना राहतील.

या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| **वन्यजीव वृत्त** | **वन्यजीव विभाग** | **राष्ट्रीय उद्यान/अभयारण्याचे नाव** | **पद संख्या** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **नागपूर** | पेंच नागपूर | पेंच राष्ट्रीय उद्यान | **५** |
| | गोंदिया | नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान | **८** |
| | | नागझिरा अभयारण्य | **५** |
| **नाशिक** | नाशिक | यावल अभयारण्य | **६** |
| | | संरक्षण पथक (यावल) | **२** |
| | | तपासणी नाके (यावल) | **६** |
| | औरंगाबाद | गौताळा औट्रमघाट अभयारण्य | **६** |
| | अकोला | पैनगंगा अभयारण्य | **११** |
| **मुंबई** | ठाणे | तानसा अभयारण्य | **१८** |
| | कोल्हापूर | चांदोली राष्ट्रीय उद्यान व सागरेश्वर अभयारण्य | **१३** |
| | | राधानगरी अभयारण्य | **४** |
| | | कोयना अभयारण्य | **७** |
| | पुणे | भिमाशंकर अभयारण्य | **९** |
| **एकूण पदे** | | | **१००** |

२. या पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६- वनीकरण व वन्यजीवन (२४०६ ०७६६), ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवन ११० (एक) निसर्ग संवर्धन व पशुसंरक्षण (२४०६-०७६६) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०११-२०१२ या वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय दिनांक ०३.०९.२०११ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.Maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०११११०११६३५१६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( विजय सूर्यवंशी )**
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक.
सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / सर्व मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
उप सचिव (वने), वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
सर्व वनसंरक्षक (वन्यजीव) / सर्व उपवनसंरक्षक (वन्यजीव)
कक्ष अधिकारी (व्यय-१०), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
कक्ष अधिकारी (विसु-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
फ-१/फ-४ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.